

# A Multidisciplinary Approach to Higher Education

Volume - II

Edited By

Dr. Vikrant R. Wankhade

Dr. Khushal J. Alaspure

Dr. Akash V. More

Dr. Shrikant S. Mahulkar

Published by : DnyanPath Publication

# A Multidisciplinary Approach to Higher Education

Volume - II

Edited By

Dr. Vikrant R. Wankhade

Dr. Khushal J. Alaspure

Dr. Akash V. More

Dr. Shrikant S. Mahulkar

DNYANPATH
PUBLICATION

**Copyright © DnyanPath Publication (INDIA) 2024**

No part of this publication may be reproduced or distributed in any form or by any means, electronic, mechanical, photocopy, recording, or otherwise or stored in a database or retrieval system without the prior written permission of publishers. This edition can be exported from India only by the Publishers.

या संपादकीय ग्रंथात समाविष्ट सर्व संशोधनपर लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.समाविष्ट सर्व लेखांची जबाबदारी ही सर्वस्वी लेखकांची असेल.

# A Multidisciplinary Approach to Higher Education / Volume II

Edited By

Dr. Vikrant R. Wankhade, Dr. Khushal J. Alaspure

Dr. Akash V. More, Dr. Shrikant S. Mahulkar

Published by the **DnyanPath Publication (INDIA)**

A Leading **National Books Publishing** House In India

The First edition published in April, 2024

**ISBN 13 : 978-81-972505-0-7**

Visit us

www.dnyanpath.com

**ISO 9001 : 2015**

ज्ञानपथ पब्लिकेशन

| | | |
|---|---|---|
| **Reg. Office** | : | FFS-A, Block C,First Floor, Venus Plaza, Shegaon Naka, V.M.V. Road, Amravati - 444 603 (MH) |
| **Branch Office** | : | Kalash Apartment, Near Gulmohar Holl, Pande Layout Khamla Nagpur - 440 025 (MH) |
| **Visit us** | : | www.dnyanpath.org |
| **Contact us** | : | dnyanpathpub@gmail.com |
| **Phone** | : | 08600353712, 09503237806 |

**Printed at Shri Gurudeo Printers, Amravati.**

Mahatma Fule Sankul, Shegaon Naka,

V.M.V. Road, Amravati - 444603 (Maharashtra)

**₹ : 700/-**

45-47
48-50
51-59
60-61
62-64
65-66
67-71
72-75
76-78
79-80
81-83
84-87
88-90
91-93
94-96
97-98
99-100

32. **Physical Education and Sports: Career Opportunities for Sportsperson** 101-102
Saurabh A. Makde

33. **Reviving the Roots: Traditional Sports and Games (TSG) for a Healthier Generation and a Well-rounded Education System** 103-104
Prof. Ravi Sahu, Prof. (Dr.) S. R. Raghuvanshi

३४. **राष्ट्रसंत तुकडोजी : अभंगरुप आत्मकथनातील भक्तितत्व** 105-109
प्रा. डॉ. दिनेश की. राऊत

३५. **जागतिकीकरण आणि मराठी साहित्य** 110-112
डॉ. मिलिंदकुमार भिकाजी देवरे

३६. **खेळ आणि पोषण** 113-115
प्रा. डॉ. कु. निलीमा प्र. माहोरे

३७. **''हरित अर्थव्यवस्था आणि पर्यावरण''** 116-118
प्रा. पराग गावंडे

३८. **''डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे उच्च शिक्षण व्यवस्थेविषयी विचार''** 119-121
प्रा. प्रभाकर व्ही. घोडेस्वार

३९. **राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० - एक परिचय** 122-126
डॉ. सागर प्रल्हादराव नारखेडे,

४०. **मराठी भाषा आणि व्यवसायांच्या संधी** 127-130
प्रा. डॉ. अंशुमती राजेंद्र काहाणे


***

# मराठी भाषा आणि व्यवसायाच्या संधी

**प्रा. डॉ. अंशुमती राजेंद्र काहाणे**
श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती - ४४४७०५
मो.नं. ९४०४१०९२८०
ईमेल : anshumati.pendokharegmail.com

डॉ. रमेश धोंगडे या भाषासंशोधकाच्या मते, भाषेचा तथाकथित विकास हा भाषेच्या प्रसारातून आणि मुख्यत: तिच्या वापरातूनच तपासता येतो. म्हणजेच दैनंदिन व्यवहारात ती भाषा किती प्रमाणात वापरली जाते यावरूनच त्या भाषेच्या भवितव्याबाबतचे आडाखे बांधणे शक्य आहे.

'डायनीएल एब्राम' या अमेरिकेतील गणिताच्या अभ्यासकाच्या मते, एखादी विशिष्ट भाषा ही ती भाषा बोलणार्या समाजास व्यवसाय देवू शकत नसेल तर ती भाषा तो भाषिक समाज सोडून देण्याचा प्रयत्न करतो. याचा अर्थ भाषासंहाराचे मूळ हे व्यवसाय आणि पर्यायाने उदरनिर्वाह या घटकात आहे असे मानता येईल. मराठी भाषेसंदर्भात बोलायचे झाल्यास दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढायला हवा, मराठी भाषेची सामाजिक प्रतिष्ठा वृद्धिंगत व्हायला हवी आणि मुख्य म्हणजे मराठी भाषेच्या उपयोजनातून जास्तीत जास्त व्यवसायसंधी उपलब्ध व्हायला हवी. कोणत्याही विषयात परिपूर्ण ज्ञान मिळविणे, त्या विषयाच्या संकल्पना समजून घेणे आणि त्या विषयाच्या अभ्यासातून मिळालेल्या ज्ञानाचा प्रभावीरीत्या वापर करता येणे ही करिअर घडवण्याच्या दृष्टिकोनातून यशाची गुरूकिल्ली आहे असे म्हणता येईल. या परिप्रेक्ष्यातून व्यवसायपूरक अशा काही क्षेत्रांची चर्चा करणे इष्ट ठरेल.

१) **भाषांतर, अनुवाद :** जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून विविध भाषा-संस्कृती यांचा परिचय होऊ लागला. अन्य भाषांमध्ये निर्माण होणारे ज्ञान स्वभाषेत उपलब्ध व्हावे अशी अपेक्षा वाचक आणि लेखक यांना असणे स्वाभाविक आहे. भाषांतर आणि अनुवादासाठी अथांग भांडार आज मराठी भाषेसमोर उभे आहे. अन्य भाषांमध्ये उपलब्ध असलेले दर्जेदार साहित्य स्वभाषेत आणून वाचकांना त्यांचा परिचय करून देण्यासाठी भाषांतराचा आधार घेतला जातो. यासाठी किमान दोन भाषांवर प्रभुत्व असणे गरजेचे आहे. केवळ भाषा लिहिता-वाचता येणे म्हणजे भाषिक क्षमता नाही. तर दोन भाषांमधील समाज-संस्कृतीचा अभ्यास असणेही आवश्यक आहे. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, चीनी आणि अन्य भाषांमध्ये ज्ञानाचा खजिना आहे. तो मराठी भाषकांपर्यंत पोहचण्यात भाषा हा अडसर ठरू नये यासाठी जास्तीत जास्त भाषांतरे व्हायला हवीत. भाषांतरात मौखिक व लिखित असा भेद करता येईल. दोन भिन्न भाषिकांमध्ये मौखिक भाषांतर करणारा दुभाषी हेसुद्धा उदयाला आलेलं एक क्षेत्र आहे. भाषांतर हा आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात व्यवसाय संधी उपलब्ध करून देणारा विभाग आहे.

२) **आकाशवाणी :** मौखिक आणि लिखित दोन्ही भाषिक कौशल्ये असल्यास आकाशवाणी ही सुवर्णसंधी ठरू शकते. वृत्तनिवेदक, रेडिओ जॉकी, मुलाखतकार, पत्रकारिता, नभोनाट्य, डबिंग यांसारखी अनेक क्षेत्रे उपलब्ध होऊ शकतील. त्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये आत्मसात करायला हवीत. रेडिओ जॉकीसाठी किमान तीन भाषा अस्खलीत बोलता यायला हव्यात. बहुश्रुतपणा, श्रोत्यांना खिळवून ठेवून सलग तीन तास मनोरंजन करण्याची क्षमता विकसित करायला हवी.

३) **दूरचित्रवाणी :** दूरदर्शन आणि अखंडपणे सुरू असणार्या खाजगी वाहिन्या यांमध्ये अनेक करियरच्या वाटा निर्माण झाल्या आहेत. वृत्तनिवेदनासोबतच वाहिन्यांवरील चर्चा, परिसंवाद, मुलाखत तसेच कॅमेरा युनिटसह होणारे वृत्तांकन यांमधून अनेक नवी क्षेत्रे खुणावत आहेत. याशिवाय वाहिन्यांवरील कार्यक्रमांचे सूत्रसंचालन, मालिकांचे पटकथालेखन, संवादलेखन, जाहिरात इत्यादी घटकांकडे व्यवसाय म्हणून पाहता येईल.

४) **प्रिंट मिडिया :** वृत्तपत्रे, नियतकालिके व अनियतकालिके यांमध्ये भाषिक क्षमतेची कसोटी लागते. बातमीदार ते संपादक अशी चढती पदनामावली यात कार्यरत असते. बातमी, लेख, अग्रलेख, विविध सदरे यांमधून अनेक विषयांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करावे लागते. वृत्तपत्रीय लेखनाला धावपळीचे साहित्य असे म्हणतात. स्वाभाविकपणे नियोजित आणि अनियोजित अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टींसाठी तत्पर

राहून विहित वेळेत विश्लेषण करण्याची क्षमता विकसित करणे गरजेचे आहे. जाहिरात, छपाई, अक्षरजुळणी, संपादन कौशल्य अशा विविध विभागांकडेही सकारात्मक दृष्टीने पाहायला हवं.

५) **चित्रपट व नाट्यक्षेत्र :** मनोरंजन क्षेत्राने आज मानवी जीवन व्यापून टाकले आहे. चित्रपट आणि नाटक हे यातील महत्त्वाचे घटक. चित्रपटनिर्मितीत मराठी भाषा पटकथालेखन, संवाद आणि गीतरचना यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते. अर्थातच केवळ भाषिक क्षमता नाही तर प्रतिभाशक्तीची जोड असेल तरच नवनिर्मिती होऊ शकते. नाट्यसंहितालेखनाच्या बाबतीत हेच सूत्र महत्त्वाचे ठरते. संवादफेक किंवा साहित्यभाषेत ज्याला वाचिक अभिनय म्हणतात यांना चित्रपट व नाट्य अशा दोन्ही क्षेत्रांत विशेष महत्त्व असते. आवश्यक ते भाषिक ज्ञान असेल तर प्रसिद्धी आणि पैसा दोन्हीही मिळवून देणारी चित्रपट व नाट्य ही क्षेत्रे व्यवसाय म्हणून निश्चितच महत्त्वाची ठरू शकतील.

६) **साहित्य-समीक्षा (सर्जनशील लेखन) :** प्रतिभा, विद्वत्ता आणि त्याला सातत्यपूर्ण अभ्यासाची जोड मिळाल्यास कसदार साहित्यनिर्मिती घडू शकते. कविता, नाटक, कादंबरी, कथा, प्रवासवर्णन, चरित्र, आत्मचरित्र यांसारख्या सृजनशील लेखनाकडे अलीकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले आहे. पुस्तकपरीक्षण, नाट्यपरीक्षण, चित्रपटसमीक्षा, साहित्यसमीक्षा, व्याकरण, कोशनिर्मिती, ह्यासारख्या लेखनातून करियरच्या नव्या वाटा सापडू शकतात. भाषिक क्षमतेसोबतच नवनिर्मितीची क्षमता असणार्यांनी या क्षेत्राचा व्यवसाय म्हणून नक्की विचार करावा.

७) **सूत्रसंचालन :** अलीकडील काळात सूत्रसंचालन हा मान्यताप्राप्त व्यवसाय म्हणून स्वीकारलेला दिसतो. पुरस्कारवितरण सोहळा, सांस्कृतिक कार्यक्रम, रिऍलिटी शोज, विविध सादरीकरणाचे कार्यक्रम, वाहिन्यांवरील कार्याम, शासकीय कार्याम किंवा अन्य प्रासंगिक कार्यक्रमांसाठी दर्जेदार सूत्रसंचालनाची अपेक्षा केली जाते. बदलत्या काळात सूत्रसंचालन हे केवळ दोन कार्यक्रमांच्या मधील जागा भरून काढणे एवढ्यापुरते मर्यादित राहिले नसून कार्यक्रमाचा तो एक महत्त्वाचा भाग बनला आहे. भाऊ मराठे, मंगला खाडिलकर, धनश्री लेले, सुधीर गाडगीळ, स्वाती वाघ, जितेंद्र जोशी, डॉ. निलेश साबळे यांसारख्या सूत्रसंचालकांनी या क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटवला आहे. बहुश्रुतता, हजरजबाबीपणा, प्रसंगावधान, बोलण्यातील सहजता सूत्रसंचालकाकडे असणे गरजेचे आहे.

८) **अध्यापन :** अध्यापन हे सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे क्षेत्र असल्याने स्वाभाविकपणे या क्षेत्राकडे अनेकांचा ओढा असतो. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अध्यापनात मराठी भाषा विषय घेऊन व योग्य ती शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास अध्यापन क्षेत्रात प्रवेश करता येईल. आजच्या घडीला प्रचंड स्पर्धा असली तरी गुणवत्ता आणि चिकाटी असल्यास नक्कीच यश मिळवता येईल.

९) **मुद्रित शोधन :** मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रित शोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल. वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मितीक्षेत्र तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर नियमाबरहुकून तपासण्याचे काम बहुतांशवेळेस घरबसल्या करता येते. आज मुद्रितशोधनतज्ज्ञांची कमतरता असल्याने नवी संधी म्हणून याकडे पाहता येईल.

१०) **केंद्रीय व महाराष्ट्र लोकसेवा आयोग :** एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी आणि अन्य स्पर्धा परीक्षांमध्येही मराठी भाषेला महत्त्वाचे स्थान आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेत ३०० गुणांचा द्वितीय भाषेचा पेपर म्हणून मराठी विषय निवडता येतो, तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पूर्व आणि मुख्य परीक्षेतही मराठी भाषा महत्त्वाची ठरते. मुख्य परीक्षेत निबंधलेखन, उतार्यावरील प्रश्न, व्याकरण आदी घटकांवर आधारित १०० गुणांचा पेपर असतो. याशिवाय अन्य स्पर्धा परीक्षांमध्येही मराठी भाषा विषय निर्णायक ठरू शकतो.

११) **संगणक आणि मराठी :** संगणकाने मानवी जीवन व्यापून टाकले आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. मराठीत टंकलेखन करण्याची गरज मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येते. वृत्तपत्रे, नियतकालिके, शासकीय दस्तावेज, शैक्षणिक साहित्य यांपासून एम.फिल, पीएच.डी प्रबंधांचे टंकलेखन अलीकडे संगणकावर करून त्यात हवा तसा बदलही करता येतो. महाजालावरील मराठी संकेतस्थळांच्या निर्मितीसाठीही मराठी टंकलेखन व अन्य कौशल्ये महत्त्वाची ठरतात. संगणक व मराठी यांचे उत्तम ज्ञान असल्यास हा अर्थार्जनाचा चांगला स्रोत आहे.

१२) **व्यावहारिक/ कार्यलयीन कामकाज :** कार्यालयीन पत्रव्यवहार, इतिवृत्त, अहवाल, टिप्पणी यांमध्ये भाषिक कौशल्यांची कसोटी लागते. शासनदरबारी प्रशासकीय भाषेचा अभ्यास असणार्या तज्ज्ञांची नियुक्ती केली जाते. शासननिर्णय, शासकीय परिपत्रके तयार करण्यासाठी प्रशासकीय भाषेचा अभ्यास आवश्यक ठरतो. व्यावहारिक भाषेपेक्षा वेगळ्या

पारिभाषिक संकल्पना यात वापरल्या जातात. ही परिभाषा आव्हानात्मक असली तरी त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

मराठी भाषिकांना मनोरंजनाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत. फू बाई फू, भाऊचा धक्का, चला हवा येवू द्या, तुमच्यासाठी काय पण यासारखे रंजनात्मक कार्यक्रम आहेत. योगेश शिरसाट, भाऊ कदम, वैभव मांगले, भारत गणेशपुरे, निलेश साबळे, सुप्रिया पाठारे, श्रेया बुगडे, किशोरी अंबिये असे कितीतरी कलावंत आहेत. हे सर्व कलावंत भाषिक नैपुण्यामुळे लोकप्रिय तर झालेच आहेत. आज ते सुद्धा इतरांना या क्षेत्रात रोजगार देऊ शकतात, इतके सामर्थ्य त्यांच्यात आहे. सांगण्याचे तात्पर्य भाषा आणि साहित्य याचा सुरेख संगम अशा मनोरंजनात्मक कार्यक्रमात झालेला असतो. इथे गरज आहे हजरजबाबी व संवाद कौशल्याची. भाषिक कौशल्य असेल तर व्याख्यान, सूत्रसंचालन, कीर्तन व प्रबोधनात्मक कार्यक्रमातून मोठ्या प्रमाणात मराठी माणसाला मानधन मिळू शकते. कारण विषयाला धरून विषयांतर करणारे विषयावर बोलणारे वक्ते फार कमी झालेले आहेत. एका तासासाठी काही प्रभावी वक्त्यांना, निवेदकाना, कीर्तनकाराना कमीत कमी वीस ते पंचवीस हजार रुपये दिले जातात. तरी अशांच्या तारखा मिळत नाहीत. त्यांची सहा सहा महिने एक वर्ष आदी तारीख बुक झालेली असते. यामध्ये काही लोककलावंत देखील आहेत. वक्तृत्व, संगीत आणि गायन या माध्यमातून ते प्रभावी कार्यक्रम देतात.

आचार्य अत्रे, शिवाजीराव भोसले, राम शेवाळकर, बाबासाहेब पुरंदरे, नरहर कुरुंदकर, पु. ल. देशपांडे या जुन्या नावाबरोबरच अनेक नवे नावे सांगता येतील वक्तृत्व कलेमुळेच यांनी मराठी माणसाच्या मनावर राज्य केले. अशांना अर्थार्जन सोबतच लोकप्रियता देखील तितकीच मिळालेली आहे.असे सांगितले जाते लता मंगेशकरांच्या एका कार्यक्रमाचे निवेदन राम शेवाळकर यांच्याकडे होते.तिथे आलेल्या श्रोत्यापैकी पन्नास टक्के शेवाळकरांचे निवेदन ऐकण्यासाठी आले होते.

सृजनात्मक साहित्य लेखनातही काही प्रमाणात रोजगाराच्या संधी आहेत.कथा, कादंबरी,एकांकिका, नाटक, चरित्र लेखनास फारसे पैसे मिळत नसले तरी जो काही आनंद मिळतो त्याची तुलना कशाशीही करता येत नाही.रूपांतर कौशल्याला आज अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कलाकृतीला एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात म्हणजेचं कथा, कादंबरीवर आधारित एकांकिका,नाटक. आकाशवाणीसाठी श्रुतिका,दूरचित्रवाणीसाठी मालिका, चित्रपटसहिता हे रूपांतराची उदाहरणे होत. कवितेवर आधारितही सादरीकरण केले जाते. 'मराठवाड्याचा गळा बहिणाबाईचा मळा' 'गोकुळवाटा, गीतरामायण असे कितीतरी रूपांतराची उदाहरणे देता येतील. तात्पर्य असे की याही क्षेत्रात करिअर करता येते. चरित्रे, शब्दांकन, वैचारिक लेखन दर्जा टिकवून ठेवल्यास इथे सुद्धा रोजगाराच्या संधी नाकारता येत नाहीत. केवळ रोजगारच नव्हे, तर या क्षेत्रातल्या व्यक्तीचे नाव हे अजर, अमर व अक्षर राहते.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही रोजगार आहेत. जगात ज्या काही भाषा बोलल्या जातात. प्रचलित स्वरूपाच्या आहेत. त्यापैकी सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषेत मराठी भाषेचा क्रमांक बारा ते तेरा क्रमांकाचा आहे. आज युनिकोड प्रणालीमुळे संगणक, इंटरनेटवरील मराठीचा वापर सुकर बनला आहे. मराठी साहित्य व भाषा टिकवित बहुभाषिकता विकसित केल्यास करिअरच्या संधी आहेत. असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. कोरोना काळामध्ये तर ज्यांना तंत्रज्ञानाचे ज्ञान होते त्यांना मोठ्या प्रमाणात या माध्यमातून विविध कार्यक्रमासाठी तंत्र सहायक म्हणून मागणी होती. याबरोबरच संकेतस्थळ, डेटाइंट्री व युट्यूब यासारख्या क्षेत्रात करिअरच्या संधी शोधता येतात.

**सारांश :**

समाज व संस्कृतीचे वाहक म्हणून आपण भाषा व साहित्य याकडे पाहत असतो. महाराष्ट्रातील मराठी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची बेकारी मोठ्या प्रमाणात आहे, हे काही प्रमाणात तथ्य असले तरी रोजगाराच्या कुठल्याच संधी उपलब्ध नाहीत, असे म्हणणे देखील चुकीचे आहे. ज्यांच्याकडे कौशल्य आहे, जो प्रामाणिकपणे एखादे काम करतो, सातत्य व जिद्द ज्यांच्यामध्ये आहे, ते शक्यतो बेकार राहू शकत नाहीत. आपल्या स्वतःच्या विश्वकोशातला पहिला शब्द म्हणजे आळस हा दुर्गुण. त्यामुळे आपणास अनेक संकटाला तोंड द्यावे लागते. जीवन व्यवहाराच्या सर्वच क्षेत्रात साहित्य व भाषेची आवश्यकता असते. भाषेशी संबंधित करिअरची क्षेत्रे शेकडो आहेत. कुठल्याही गोष्टीविषयी मनात साशंकता असेल तर आत्मविश्वास कमी पडतो. आत्मविश्वासाने व गांभीर्याने आपल्यातला राजहंस ओळखून आपण जर भाषा व साहित्याचा विचार केला तर लक्षात येईल की, यात जागोजागी संधी दडलेल्या आहेत. आकाश खूप मोकळं व स्वच्छ आहे. गरज आहे आपण खिडकी काढून बाहेर पाहण्याची.

एकविसावे शतक माहिती-तंत्रज्ञानाचे शतक जसे आहे, तसे धावपळीची शतक देखील वाटायला लागले आहे. अशा वेळी लोकांचे मनोरंजन व प्रबोधन करण्यासाठी प्रसारमाध्यमे हे एक महत्त्वाचे साधन ठरते. या क्षेत्रात प्रयत्नवादी आणि कौशल्याने युक्त असलेल्या व्यक्तींना खूप संधी आहेत. 'न बोलणाऱ्याचे सोने ही विकली जात नाहीत आणि बोलणाऱ्याच्या चिंध्या विकल्या जातात' असे जे म्हटले जाते, त्यात काही प्रमाणात तथ्य वाटायला लागते. लोकांशी चांगल्या प्रकारे संवाद साधणारा तसेच लिहिणारा

आजही तो बेकार राहू शकत नाही. तंत्रज्ञानाच्या युगात माणूस यंत्रासारखे संवेदनहीन बनत चालला असला तरी माणूस हा संवेदनशील व सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे साहित्याची मानवी जीवनात नितांत गरज आहे. मराठीत अण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके, विरुपाक्ष व उमा कुलकर्णी असे कितीतरी साहित्यिक आहेत ज्यांनी लेखनातून काही प्रमाणात रोजगार शोधला होता. आजही लेखन काही जणांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे.

मराठी भाषिक किंवा मराठी विषयाचे पदवीधर व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले विद्यार्थी तसेच मराठी माध्यमातील विद्यार्थी सन्मानाने जीवन जगू शकत नाहीत. त्यांना रोजगार मिळत नाही, असेही बोलले जाते. महाराष्ट्राचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की येथे सतर ते ऐंशी टक्के लोक येथे मातृभाषेतून संवाद करतात. याच भाषेच्या आधारे जीवन जगतात व व्यवहारही करतात. हे सत्य असूनही मराठी माणूस अर्थार्जन करू शकत नाही, असे बोलले जाते हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

**संदर्भ :**


- प्रा. अनिल मांझे, म. ई . तंगावार, डॉ. रमेश धोंगडे, डायनिएल एब्राम (गणित अभ्यासक अमेरिका)


***

Cert. No. : DP/2024/SP11/V2-40

April, 2024

# Certificate of Publication

This is to Certify

**प्रा. डॉ. अंशुमती राजेंद्र काहाणे**

Has Published his/her chapter in the edited book on

**A MultidisciplinaryApproach to Higher Education / Volume II**

bearing ISBN "978-81-972505-0-7" Entitled

**मराठी भाषा आणि व्यवसायाच्या संधी**

**Dr. Vikrant R. Wankhade**
Director of Physical
Education & Sports
Bharatiya Mahavidyalaya,
Amravati

**Dr. Khushal J. Alaspure**
Director of Physical
Education & Sports
Narayanrao Rana Mahavidyalaya,
Badnera, Amravati

**Dr. Akash V. More**
Director of Physical
Education & Sports
Yuvashakti Arts & Science
College, Amravati

**Dr. Shrikant S. Mahulkar**
Director of Physical
Education & Sports
Late D. P. Arts College,
Nandgaon Peth, Amravati

ISO 9001 : 2015
ज्ञानपथ पब्लिकेशन
A Leading National Books Publishing House In India

dnyanpathpub@gmail.com www.dnyanpath.com 08600353712, 09503237806